**विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती द्वारा संचालित**

# महिला आर्टस् कॉमर्स कॉलेज

# चांदुर (रेल्वे), जि. अमरावती

(संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती संलग्नित)

(नॅक द्वारा 'ब' श्रेणी प्राप्त)

# माहिती पुस्तिका

संकेतस्थळ: www.macccr.org

# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## ।।विद्यापीठ गीत।।

विद्या चिंतन । विद्यामंथन ।
विद्यासर्जन । विद्याजीवन ।।

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठचाले
संत गाडगे बाबा तुमचे स्वप्न पुर्ण झाले
कुणी न आता खुळे अडाणी, ज्ञानासह विज्ञान कळाले ।।
पर्णकुटीतील प्रतिभेलाही, आभाळाचे पंख मिळाले
दशसुत्राचे अक्षर अक्षर, वेद नवा बोले ।।१  जनमन...

किती रंजले, किती गांजले, किती आंधळे लुळे पांगळे
कर्मयोग निष्काम आचरून, कवेत घेता बांधव सगळे
भूतदयेच्या ओलाव्याने, मानस मौहरले  ।।२ जनमन...

धर्मजातीच्या पलीकडेही माणूस केवळ माणूस अस
भेदभ्रमांचे बंध तोडून मानवतेचे पूजन करती
पिढ्यान पिढ्यांचे जीवनदर्शन विश्वात्मक झाले ।।३ जनमन...

जनमन जागर, करीत निरंतर, विद्यापीठ चाले

-प्राचार्य डॉ. विठ्ठल वाघ

# विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावत्ती
## * संस्थेचे पदाधिकारी *

| अ. क्र. | पदाधिकाऱ्यांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १. | मा. डॉ. नितीन रामदास धांडे | अध्यक्ष |
| २. | मा. ॲड. उदय शशिकुमार देशमुख | उपाध्यक्ष |
| ३. | मा. प्रा. डॉ. हेमंत मुरलीधर देशमुख | कोषाध्यक्ष |
| ४. | मा. श्री. युवराजसिंग वसंतराव चौधरी | सचिव |
| ५. | मा. श्री. नितीन बाबुरावजी हिवसे | सदस्य |
| ६. | मा.प्रा.डॉ.सौ पूनमताई युवराजसिंग चौधरी | सदस्य |
| ७. | मा. श्री. पंकज सुरेन्द्रराव देशमुख | सदस्य |
| ८. | मा. प्रा. श्री. विनय पुंडलीकराव गोहाड | सदस्य |
| ९. | मा. प्रा. गजानन शंकरराव काळे | सदस्य |

# संस्थे विषयी

सर्व सन्माननीय सदस्यांच्या सहकार्याने विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावती या शैक्षणिक संस्थेची स्थापना १९६५ साली करण्यात आली.

ग्रामीण भागात शिक्षणाचा प्रसार व्हावा या उदात्त हेतूने प्रेरित होऊन या संस्थेची स्थापना करण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना शहरात राहून शिक्षण घेता यावे म्हणून पहिल्या निवासी छात्रालयाची अमरावती येथे स्थापना केली; आणि शैक्षणिक क्षेत्रात भरीव कामगिरी पार पाडण्यासाठी छोटी पण सुनिश्चीत अशी सुरुवात करून आपल्या कार्याची मुहूर्त मेढ रोवली.

ग्रामीण भागात उच्चशिक्षणाची निकड लक्षात घेता शिक्षण प्रसाराच्या पहिल्या कालखंडात संस्थेने विविध ठिकाणी विद्यालये, विज्ञान महाविद्यालये आणि कला व वाणिज्य महाविद्यालये स्थापन केलीत. त्यानंतरच्या काळात अभियांत्रिकी महाविद्यालये, दंतमहाविद्यालय व तंत्रनिकेतन आणि कला व वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

महिलांकरिता उच्चशिक्षणाची निकड लक्षात घेता दोन महिला महाविद्यालये सुद्धा स्थापन करण्यात आलीत, जी आज उच्चशिक्षणाच्या क्षेत्रात यशस्वीपणे वाटचाल करीत आहेत.

१९६५ साली पेरलेल्या शिक्षण प्रसाराच्या विजाचे महत्प्रयासाने प्रथमतः इवल्याशा रोपट्यात आणि आता विस्तीर्ण डेरेदार वृक्षात रूपांतर झाल्याचे संस्थेच्या रूपात पाहावयास मिळत आहे.

संस्थेच्या वरिष्ठ सदस्यांनी आखून दिलेल्या ध्येयधोरणाप्रमाणे व संस्थेस प्राप्त करून दिलेल्या नावलौकिक प्रमाणे संस्थेची नवीन कार्यकारिणी संस्थेचे अध्यक्ष डॉ. नितीन धांडे यांच्या सक्षम व प्रतिभाशाली नेतृत्वाखाली वाटचाल करीत आहे.

ग्रामीण विद्यार्थिनींना उच्चशिक्षणाची संधी सहज उपलब्ध व्हावी या उदात्त हेतूने १९९१ साली विदर्भ युथ वेलफेअर सोसायटी, अमरावतीच्या सर्वसन्माननीय सदस्यांच्या प्रेरणेने व सहकायनि चांदुर रेल्वे येथे महिला कला – वाणिज्य महाविद्यालयाची स्थापना करण्यात आली.

पदवीपर्यंतच्या शिक्षणाची व्यवस्था असलेल्या या महाविद्यालयातील विद्यार्थिनींना पुढे पदव्युत्तर शिक्षणाची समस्या होती. ही समस्या लक्षात घेऊन महाविद्यालयाने शैक्षणिक सत्र २००४-२००५ पासून एम. ए.(मराठी) व सत्र २००८-२००९ पासून एम. ए.(गृहअर्थशास्त्र) हे विषय महाविद्यालयात सुरू केलेत. पुढे पदव्युत्तर शिक्षणानंतर मराठी व इंग्रजी या विषयातील पीएचडी पदवीसाठी संशोधन केंद्राची मान्यता मिळवण्यात आली.

अनुसूचित जाती-जमाती व मागासवर्गीय विद्यार्थिनीं करीता तसेच अनुत्तीर्ण विद्यार्थिनीं करीता विशेष शिकवणी वर्गआणि प्रज्ञावंत विद्यार्थिनीं करीता महाविद्यालयात तज्ञ प्राध्यापकांकडून विशेष मार्गदर्शन दिले जाते. अनेक विद्यार्थिनी या योजनांचा लाभ घेत आहेत.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींना छोट्या छोट्या गावांतून महाविद्यालयात येताना अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. बरेचदा केवळ बसेसची सुविधा नाही या कारणामुळे विद्यार्थिनींना येणाऱ्या समस्या विचारात घेऊन महाविद्यालयाच्या परिसरात प्रशस्त आणि सर्व सुविधांनी युक्त अशा वसतिगृहाची निर्मिती करण्यात आली आहे, जेणेकरून वसतिगृहात राहून विद्यार्थिनी आपले शिक्षण पूर्ण करू शकतील. या वसतिगृहाची प्रवेश मर्यादा ६० एवढी आहे. साधारणतः जुलै महिन्यात वसतिगृहाची प्रवेश प्रक्रिया सुरू केली जाते.

ग्रामीण भागातील विद्यार्थिनींच्या हिताचा विचार करून अनेक योजना महाविद्यालयात राबविण्याचा संस्थेचा मानस आहे.

=================

## VISION

To empower girls and women in rural specific with knowledge and confidence in the rouse of globalization to define the future of India through qualitative and enriching women's education.

## MISSION

To enable all girls and women students to put in mind intellectually, morally, socially, ethically and economically responsible for becoming good citizens endowed with positive attitude required to enrich personal and social growth.

## GOAL

The goal of the centre is to provide equal opportunities to students belonging to backward and deprived classes. It has been observed that many students belonging to backward and deprived classes are unable to take higher education and ICT training and skill development training due to lack of financial resources.

# महिला आर्टस् कॉमर्स कॉलेज
# चांदुर (रेल्वे), जि. अमरावती

**प्राचार्य प्रा. डॉ. तुषार देशमुख,** (PhD, BE, ME, MBA)

## प्राध्यापक वृंद

| अ.क्र. | प्राध्यापकांचे नाव | पदनाम | विषय /विभाग | शैक्षणिक पात्रता |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा. डॉ. सौ. सीमा जगताप | प्राध्यापक | इंग्रजी | MA (Eng), MPhil, PhD |
| २ | प्रा. डॉ. विजय कापसे | सहयोगी प्राध्यापक | अर्थशास्त्र | MA (Eco), PhD |
| ३ | प्रा. सौ. अनिता धुर्वे | सहाय्यक प्राध्यापक | गृह अर्थशास्त्र | MA (HEco), SET |

## विविध उपक्रम

महाविद्यालयात शैक्षणिक सत्राच्या आरंभी मराठी व इंगजी वाङ्मयमंडळ, गृहअर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र व भूगोल इत्यादी विषयांच्या मंडळाची स्थापना करण्यात येते. त्यानंतर वर्षभर राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांचे नियोजन करण्यात येऊन त्याप्रमाणे कार्यक्रम राबविले जातात.

उदा. विविध विषयांवरील कार्यशाळा, मानव संसाधन मंत्रालय अंतर्गत शब्दावली आयोग, नवीदिल्ली द्वारा दोन दिवसीय कार्यशाळेचे महाविद्यालयातर्फे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. तज्ज्ञांची व्याख्याने तसेच विषयाशी संबंधित सर्वेक्षण, विविध कारखान्यांना भेटी, अभ्याससहल इ. उपक्रमांच्या माध्यमांतून विद्यार्थिनींचा सर्वांगीण विकास व्हावा, विद्यार्थिनी ज्ञानसंपन्न व प्रतिभाशाली तसेच कर्तृत्ववान व्हाव्यात यादृष्टीने प्रयत्न केले जातात.

### * राष्ट्रीय सेवा योजना

महाविद्यालयात कार्यरत असलेल्या राष्ट्रीय सेवा योजना पथका द्वारे नियमित व विशेष शिबिरांतर्गत विद्यार्थिनींमध्ये राष्ट्रभक्तीची भावना व सामूहिक सेवेची वृत्ती रूजविण्याचा तसेच त्यांच्यात नेतृत्वाचे गुणविकसित करण्याचा व त्याद्वारे त्यांचा सर्वांगीण विकास साधण्याचा प्रयत्न केला जातो.

### * क्रीडा विभाग

विद्यार्थिनींचा शारीरिक, बौद्धिक, भावनिक व सामाजिक विकाससाधून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास व्हावा यादृष्टीने बॅडमिंटन, क्रिकेट, व्हॉलिबॉल, खो-खो, कबड्डी अशा विविध प्रकारच्या खेळांचा सराव करण्याकरिता विद्यार्थिनींना प्रोत्साहित केले जाते.

### * स्नेहसंमेलन / सांस्कृतिक कार्यक्रम

विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वाला विकसित करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्तगुणांना वाव मिळावा याहेतूने महाविद्यालयात वर्षभर विविध कार्यक्रम तसेच वार्षिक स्नेहसंमेलन आयोजित केले जाते.

### * शैक्षणिक सहल

विद्यार्थिनींना देशाची व राज्याची भौगोलिक, ऐतिहासिक व सांस्कृतिक माहिती व्हावी, प्रवासातून सहजीवनाचा आनंद लुटता यावा व त्यांच्या ज्ञानात भर पडावी याहेतूने महाविद्यालयात दरवर्षी राज्यांतर्गत तसेच राज्याबाहेर शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात येते. प्रवासभाड्यात रेल्वेची सवलत प्राप्त होत असल्यामुळे विद्यार्थिनींना सवलतीच्या दरात सहलीची सुवर्ण संधी प्राप्त होते.

### * ग्रंथालय

महाविद्यायाचे ग्रंथालय हे विविध प्रकारच्या ग्रंथांनी सुसज्जआहे. विद्यार्थिनींना उपयुक्त वाचनसामुग्री उपलब्ध आहे. ज्ञानसंवर्धन व अद्यायावत माहितीयुक्त ग्रंथांचा समावेश ग्रंथालयात आहे. त्याचबरोबर निवडक नियतकालिके आणि वर्तमानपत्रे यांचीही सोय ग्रंथालयात करण्यात आली आहे.

विद्यार्थी संख्येनुसार नवीन क्रमिक पुस्तके आणि संदर्भग्रंथाची उपलब्धता, नियतकालिकांच्या संख्येत वाढ, विद्यार्थिनींच्या व्यक्तिमत्वाचा विकास होण्याच्या दृष्टीने रोजगार मार्गदर्शन, सामान्य ज्ञान स्पर्धा, थोर महात्म्यांची जयंती व पुण्यतिथी यांसारखे विविध उपक्रम ग्रंथालयाच्या वतीने राबविण्यात येतात.

## * वार्षिकांक

महाविद्यायाचे मुखपत्र असलेला 'प्रियदर्शनी' हा वार्षिकांक महाविद्यालयाचे आगळेवेगळे वैशिष्ट्य आहे. विद्यार्थिनींच्या सुप्त वाङ्मयीन गुणांना वाव देण्यासाठी हे प्रभावी व परिणामाकारक माध्यम आहे. या अंकाचे संपादन, वितरण आणि प्रकाशन या तीनही बाबतीत विद्यार्थिनींचाच सहभाग असून 'प्रियदर्शनी' हा वार्षिकांक मुद्रितस्वरूपात प्रकाशित होत असतो.

## * करिअर कट्टा

महाराष्ट्र उच्च व तंत्रशिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राच्या संयुक्त विद्यमाने 'करिअर कट्टा' हा उपक्रम दिनांक २५फेब्रुवारी २०२१ पासून महाविद्यालयात सुरू आहे. या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी वर्षभर सातत्याने करिअर विषयक मार्गदर्शन केले जाते. त्यात विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षा, उद्योजकता विकास, कौशल्य विकास यां सारखे मार्गदर्शन तसेच वेगवेगळे उपक्रम राबवले जातात. या अभियानाचा पुढील टप्पा म्हणून “Center of Excellence”हा प्रकल्प हाती घेण्यात येणार आहे.

## * राष्ट्रीय शिक्षण धोरण

नवीन शैक्षणिक धोरणाला अनुसरून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० हे सत्र २०२४-२५ पासून पदवी अभ्यासक्रमाला तसेच सत्र २०२३-२४ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांना लागू करणायात आले आहे व त्यानुसार अभ्यासक्रम देखील या उपक्रमा अंतर्गत उपलब्ध झालेले आहे.

*****************************************

# बारावी (एचएचसी) नंतरचा अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थिनींना
# भारत सरकारची शिष्यवृत्ती
# महत्त्वाची सूचना

अनुसूचित जाति-जमाती व भटक्या जाती आणि अन्य मागासर्गीय विद्यार्थिनींना त्यांच्या बारावी नंतरच्या अभ्यासक्रमासाठी भारत सरकारची शिष्यवृत्ती संचालक, समाजकल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्यामार्फत दिली जाते. खालील अपवाद वगळता इतर मागासवर्गीय विद्यार्थिनींना ही शिष्यवृत्ती प्रदान करण्यात येते.

## <u>विद्यापीठीय गुणवत्ता प्राप्त बी ए भाग-१ च्या विद्यार्थिनीं करीता शिष्यवृत्ती</u>

## खालील विद्यार्थिनी शिष्यवृत्तीसाठी अपात्र राहतील:

१. एक व्यावसायिक अभ्यासक्रम पूर्ण करून दुसरा अभ्यासक्रम घेणाऱ्या विद्यार्थिनीला शिष्यवृत्ती मिळणार नाही.
(उदा. डी एड झाल्यावर बीए ला ॲडमिशन घेणाऱ्या विद्यार्थिनी)
२. वार्षिक परीक्षेत नापास होणाऱ्या विद्यार्थिनीस शिष्यवृत्ती मिळणार नाही.
३. समान अभ्यासक्रमाला पुन्हा शिष्यवृत्ती मिळणार नाही.
४. ज्या विद्यार्थिनींच्या पालकाचे सर्व साधनांपासून मिळणारे मासिक उत्पन्न रु. १,५०,०००/- च्यावर असेल अशा विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती मिळणार नाही.
५. माध्यमिक शिक्षक व उच्च माध्यमिक शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना निःशुल्क शिक्षण राहील.

## * प्रवेश विषयक महत्त्वाच्या सूचना

१. विद्यापीठाच्या नियमानुसार प्रवेश घेण्याची अंतिम तारीख जाहीर केलेल्या तारखेनंतर प्रवेश मिळणार नाही.
२. प्रवेश अर्जात आवश्यक ती माहिती काळजीपूर्वक भरली नाही, तर अर्ज नामंजूर होण्याची शक्यता असते.
३. विद्यार्थी सहाय्यता निधीतून मदत मिळवू इच्छिणाऱ्या विद्यार्थिनींनी विशिष्ट प्रपत्रांसह प्राचार्याकडे अर्ज करावेत.
४. विद्यापीठाने वेळोवेळी पाठविलेली माहिती व नियम या माहितीपत्रकात दिलेली आहे. नवीन येणारी माहिती सूचना फलकावर वेळोवेळी लावण्यात येईल.
५. ज्यांना अस्थाई प्रवेश मिळाला असेल अशा विद्यार्थिनींनी ताबडतोब योग्य ती माहिती कार्यालयात देऊन आपला प्रवेश नियमित करून घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास पुढील परिणामांची जबाबदारी महाविद्यालयावर राहणार नाही.
६. विद्यार्थिनीने शिष्यवृत्ती करिता अर्ज केला नसल्यास व सत्राच्या मधेच महाविद्यालय सोडून गेल्यास पूर्ण सत्राची फी वसूल करण्याचा अधिकार प्राचार्यांनी राखून ठेवला आहे.
७. विद्यार्थिनींच्या गैरवर्तणुकी करिता तिला महाविद्यालयातून आवश्यकता भासल्यास निष्कासित करण्याचा अधिकार प्राचार्यानी राखून ठेवला आहे.
८. विद्यापीठ परीक्षेस प्रथम बसणाऱ्या सर्व विद्यार्थिनींना नामांकन अर्ज भरणे आवश्यक आहे.

९. महाविद्यालयात प्रत्येक विद्यार्थिनींची ७५% पेक्षा अधिक उपस्थिती असणे अनिवार्य आहे. अन्यथा, कोणतीही शिष्यवृत्ती अथवा सवलत मिळणार नाही.
१०. विद्यार्थिनींना महाविद्यालयाने ठरवून दिलेल्या गणवेशात रोज महाविद्यालयात येणे अनिवार्य आहे.

## * शिष्यवृत्ती

सर्व मागासवर्गाच्या व कमी उत्पन्न गटाच्या वर्गात मोडणाऱ्या विद्यार्थिनींनी भारत सरकारच्या शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालया मार्फत शासनाने जाहीर केल्यानुसार अर्ज करावा. अपूर्ण किंवा खोटी माहिती दिल्यास त्याविद्यार्थिनीस शिष्यवृत्तीसाठी अपात्र ठरविले जाईल व त्यास महाविद्यालय जबाबदार राहणार नाही. ज्यांच्या शिक्षणात खंड (गॅप) पडला असेल त्यांनी त्याकाळात ती काय करीत होती यासंबंधीचे कोर्टाचे ॲफिडेव्हिट देणे आवश्यक आहे.

## प्रथम वर्ष प्रवेशकरीता राखीव जागेची टक्केवारी:

| अनु. क्र. | वर्गवारी | आरक्षण टक्केवारी | जागा |
|---|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती व नवबौद्ध (SC) | १३ टक्के | १६ |
| २. | अनुसूचित जमाती (ST) | ०७ टक्के | ९ |
| ३. | भटक्या जमाती (VJ/DT) (NT-A) | ०३ टक्के | ४ |
| ४. | भटक्या जमाती (NT-B) | २.५ टक्के | ३ |
| ५. | भटक्या जमाती (धनगर व तत्सम जाती) (NT-C) | ३.५ टक्के | ४ |
| ६. | भटक्या जमाती (वंजारी व तत्सम जमाती) (NT-D) | २ टक्के | २ |
| ७. | इतर मागासवर्गीय (OBC) | १९ टक्के | २३ |
| ८. | विशेष मागास वर्गीय प्रवर्ग (SBC) | २ टक्के | २ |
| ९ | मराठा (SEBC) | १० टक्के | १२ |
| १० | आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक (EWS) | १० टक्के | १२ |
| ११ | अनाथ (Orphan) | १ टक्का | १ |

## * ओळखपत्र

प्रवेश मिळाल्यावर १० दिवसांच्या आत आपले ओळखपत्र तयार करून त्यावर प्राचार्याची सही घेणे आवश्यक आहे. विद्यार्थिनींनी ओळखपत्रासाठी आपला पासपोर्ट साईजचा फोटो प्रवेश घेते वेळी महाविद्यालयात द्यावा लागेल. प्रत्येक विद्यार्थिनीजवळ ओळखपत्र असणे आवश्यक आहे. वाचनालयातील पुस्तके, मासिके व इतर सोयी ओळखपत्राच्या आधारावरच दिल्या जातील. तसेच विद्यापीठ परीक्षेसाठी ओळखपत्र आवश्यक राहील. महाविद्यालयात प्रत्येक विद्यार्थिनीने ओळखपत्र सोबत बाळगावे,

# पदवी (बीए) अभ्यासक्रम
# PROGRAMME- BA

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या नियमानुसार बीए भाग-१, २ व ३ ह्या वर्गांना सत्र पद्धती लागू असून सत्र २०२४-२५ या शैक्षणिक सत्रापासून विद्यापीठाने राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० (NEP-2020) सुरू केलेली आहे. त्यानुसार विद्यापीठाच्या परीक्षा घेण्यात येतील.

## <u>बी ए करिता विषय कसे निवडावे:</u>

**बीए भाग- १ मध्ये प्रवेश झाल्यावर विद्यार्थिनीला खालील पैकी कोणतेही दोन विषय निवडावे लागतील.**

१. इंग्रजी
२. मराठी
३. अर्थशास्त्र
४. राज्यशास्त्र
५. समाजशास्त्र
६. गृहअर्थशास्त्र
७. भूगोल
८. मराठी वाङ्मय

**बीए भाग-२ मध्ये प्रवेश झाल्यावर विद्यार्थिनीला प्रथम वर्षात घेतलेल्या दोन विषयांपैकी एक विषय मेजर विषय व दूसरा विषय मायनर विषय असेल. विद्यार्थिनीने असा विषय मेजर म्हणून निवडावा ज्या विषयात विद्यार्थिनीला मुख्य शिक्षण घ्यायचे आहे किंवा पुढील पदव्युत्तर शिक्षण घ्यायचे आहे,**

**बीए भाग-३ मध्ये प्रवेश घेतल्यावर द्वितीय वर्षात असलेले मेजर व मायनर विषयांमध्ये शिक्षण संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने प्रकाशित केलेल्या शैक्षणिक योजना (scheme) व अभ्यासक्रमानुसार घेता येईल.**

**बीए भाग-१, बीए भाग-२ व बीए भाग-३ च्या परीक्षा विद्यापीठाच्या वेळापत्रकानुसार घेतल्या जातील.**

**सूचना:** बीए भाग १ ते ३ या अभ्यासक्रमाची शैक्षणिक योजना ( scheme) व अभ्यासक्रम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ (www.sgbau.ac.in) तसेच त्याची लिंक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (macccr.org) उपलब्ध आहे

# पदव्युत्तर (एम ए) अभ्यासक्रम

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक सत्र २०२३-२४ पासून पदव्युत्तर अभ्यासक्रमांना राष्ट्रीय शिक्षण धोरण – २०२० (NEP-2020) सुरू केलेले आहे. त्यानुसार विद्यापीठाच्या परीक्षा घेण्यात येतील.

# एम ए – मराठी

एम ए- मराठी हा पदव्युत्तर अभ्यासक्रम मानव विज्ञान विद्याशाखेत (कला गट) ( Faculty of Humanities (Arts group)) मध्ये येतो. ज्या विद्यार्थिनीं बीए मराठी हा विषय मेजर किंवा मायनर विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या आहेत त्यांना एम ए – मराठी अभ्यासक्रम निवडता येतो.

सूचना: एम ए मराठी या अभ्यासक्रमाची शैक्षणिक योजना व अभ्यासक्रम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ तसेच त्याची लिंक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# एम ए – गृह अर्थशास्त्र

एम ए- गृह अर्थशास्त्र हा पदव्युत्तर अभ्यासक्रम मानव विज्ञान विद्याशाखेत (समाज शास्त्र गट) ( Faculty of Humanities (Social Science group)) मध्ये येतो. ज्या विद्यार्थिनीं बीए गृह अर्थशास्त्र हा विषय मेजर किंवा मायनर विषय घेऊन उत्तीर्ण झालेल्या आहेत त्यांना एम ए – गृह अर्थशास्त्र अभ्यासक्रम निवडता येतो. जर बीए करतांना गृह अर्थशास्त्र हा विषय मायनर असेल तर व तो विषय विद्यार्थिनीला एम ए मध्ये मेजर विषय घ्यायचा असेल, तर सदर विद्यार्थिनीला १२ क्रेडिट्स पूर्ण करणे अनिवार्य असेल.

**सूचना:** एम ए - गृह अर्थशास्त्र या अभ्यासक्रमाची शैक्षणिक योजना व अभ्यासक्रम संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ (www.sgbau.ac.in) तसेच त्याची लिंक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर (macccr.org) उपलब्ध आहे.

## पीएच. डी. पदवी संशोधन केंद्र

महाविद्यालयात दोन विषयांमध्ये संशोधन (PhD) करता येते.

| अनु. क्र | विषय | एकूण उपलब्ध जागा | मार्गदर्शक |
|---|---|---|---|
| १ | इंग्रजी | ४ | प्रा. डॉ. सौ. सीमा जगताप |
| २ | मराठी | ६ | उपलब्ध नाही |

# पारितोषिके

प्रोत्साहनपर पुरस्कार गुणवत्ता प्राप्त विद्यार्थिनींना देण्यात येणारी पारितोषिके:

| अनु. क्र | अभ्यासक्रम | पारितोषिक |
|---|---|---|
| १ | बीए भाग- १ | पदक |
| २ | बीए भाग-२ | पदक |
| ३ | बीए भाग- ३ | पदक |
| ४ | एमए (मराठी) | पदक |
| ५ | एमए (गृहअर्थशास्त्र) | पदक |
| ६ | राष्ट्रीय सेवा योजना पुरस्कार | पदक |
| ७ | विभाग निहाय देण्यात येणारी पारितोषिके | पदक |

## विविध पदांवर कार्यरत
## महाविद्यालयातील माजी विद्यार्थिनी

१) कु. मोनाली इंगळे — सहायक प्राध्यापक, श्रीराम महिला महाविद्यालय, धामणगाव रेल्वे
२) कु. रामी तेलेवार — अप्पर कोषागार अधिकारी, नागपूर
३) कु. स्वाती दरणे — सहायक शिक्षिका (नेरपिंगळाई)
४) कु. आरती तुमडाम — सहायक शिक्षिका (राजुरा)
५) कु. रेखा इरपाते — सहायक शिक्षिका (सातेफळ)
६) कु. रेखा सहारे — सहायक शिक्षिका (धारणी)
७) कु. सुहास शेळके — सहायक शिक्षिका, चांदुरकन्याशाळा, चांदुररेल्वे
८) कु. लीना डाहे — सहायक शिक्षिका (धनोडी)
९) कु. ज्योती पडोळे — सहायक शिक्षिका (सोनगाव)
१०) कु. अर्चना पांडे — सहायक शिक्षिका, दत्तामेघेहायस्कूलनागपूर
११) कु. अर्चना देशमुख — सहायक शिक्षिका (घुईखेड)
१२) कु. कांचन चव्हाण — यशदा, पुणे
१३) कु. दर्शना काळे — एमपीएससी परीक्षा पास
१४) कु. शीतल खिरळकर — चांदुर नगरपालिका नगरध्यक्षपदी निवड
१५) कु. रीता लादे — जलसंपदा विभाग
१६) कु. निवेदिता जेवड — शासकीय आरोग्यसेविका प्राथमिक आरोग्य केंद्र, धोत्रा
१७) कु. नम्रताअतकरे — वकील
१८) कु. अमृता बनसोड — वकील
१९) कु. निशा शेवटिया — वकील
२०) कु. मेधा मोहोड — लिपिक, कुंदन ग्लोबल इन्शुरन्स, पुणे
२१) कु. वनमाला पारधी — सहायक पोलीस निरीक्षक, वधां

२२) कु. जीवनधारा नाखले मागासवर्गीय मुलींचे वसतिगृह, चांदुररेल्वे
२३) कु. अंकिता इंगळे सहायक शिक्षिका, सरस्वती प्राथमिक शाळा, चांदुररेल्वे
२४) कु. नेहा इंगळे सहायक प्राध्यापक (CHB), महिला महाविद्यालय, चांदुर रेल्वे
२५) कु. रश्मी खेडकर सहायक प्राध्यापक (CHB), महिला महाविद्यालय, चांदुर रेल्वे
२६) कु. नीलिमा टिचुकले सहायक प्राध्यापक (CHB), महिला महाविद्यालय, चांदुर रेल्वे

## महाविद्यालयाचे नियम व शिस्त

महाराष्ट्र शासन व संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांनी वेळोवेळी ठरवून दिलेल्या पत्रकानुसार विद्यार्थिनींना नियम व शिस्तीचे पालन करणे बंधनकारक राहील.

१. माहिती पत्रकातील सर्व बाबींवरील नियमांचे अवलोकन करून त्याप्रमाणे त्याची पूर्तता करावी.

२. सूचना फलकावर लावलेल्या सूचनांचे आवर्जुन पालन करावे.

३. महाविद्यालयीन विद्यार्थिनींची वर्तणूक महाविद्यालय परिसर तसेच बाहेर सुद्धा सोजन्यपूर्ण असावी. गैरवर्तन व बेशिस्त आढळल्यास संबंधित विद्यार्थिनीवर शिस्तभंगाची कार्यवाहीकरून आवश्यकता भासल्यास महाविद्यालयातून निष्कासित करण्यात येऊ शकते.

४. महाविद्यालयात वेळोवेळी होणाऱ्या स्पर्धा व कार्यक्रमांमध्ये विद्यार्थिनीचा सहभाग व उपस्थिती अनिवार्य राहील.

५. प्रत्येक विद्यार्थिनीने तिला मिळू शकणाऱ्या शिष्यवृत्तीबाबत जागृत असणे आवश्यक आहे.

६. ज्या गरीब व होतकरू विद्यार्थिनीला शिष्यवृत्ती लागू नाही अश्या विद्यार्थिनींनी आवश्यकतेनुसार रीतसर अर्ज सादर केल्यास व उत्पन्नाचे पुरावे दिल्यास त्यांना महाविद्यालयातर्फे आर्थिक मदत करण्यात येईल. असा अर्ज प्राप्त झाल्यास तो अर्ज स्वीकारण्याचा किंवा नाकारेचा अधिकार महाविद्यालायकडे राखीव असेल.

७. स्पर्धा परीक्षांची तयारी करण्यासाठी विशेष मार्गदर्शनाची सोय करण्यात येईल.

८. महाविद्यालयीन विद्यार्थिनींना गणवेश अनिवार्य आहे. कोणत्याही विद्यार्थिनीला गणवेशा विना महाविद्यालयात प्रवेश मिळणार नाही.

## महाविद्यालयाची वेळ

*** महाविद्यालयाची वेळ**

- पदवी अभ्यासक्रम: बीए (भाग-१, २ व ३)
  वेळ: सकाळी १०.३० ते ५.३० वाजेपर्यंत (सोमवार ते शुक्रवार)
  शनिवार सकाळी ८ ते दुपारी १ पर्यंत
- पदव्युत्तर अभ्यासक्रम: एम. ए. भाग-१ व २ (मराठी व गृहअर्थशास्त्र)
  वेळ: सकाळी ११ ते दुपारी ४ वाजेपर्यंत

*************************************************************